International Journal of Engineering, Management and Humanities (IJEMH)
Volume 6, Issue 1, Jan.-Feb, 2025 pp: 198-204 ISSN: 2584-2145 www.ijemh.com

# एक देश एक निवडणूक संकल्पना आणि व्यावहारिकता

प्रा. डॉ. आनंद शिंदे
सहयोगी प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
कै. बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हणेगांव ता. देगलूर जि. नांदेड-431741

Date of Submission: 02-02-2025 Date of Acceptance: 12-02-2025

**सारांश:**

एक देश एक निवडणूक ही संकल्पना भारतीय निवडणूक प्रणालीसाठी नवीन नाही. स्वातंत्र्यानंतरच्या तीन सार्वत्रिक निवडणूका लोकसभेसोबतच सर्व विधानसभांच्या पार पडल्या. तथापि नंतरच्या काळातील मुदतीपूर्व विधानसभांच्या बरखास्ती, केंद्रातील आघाड्यांचे राजकारण यामुळे लोकसभेसोबत विधानसभेच्या निवडणुकांचे वेळापत्रक गडबडले. यामुळे पुढील काळात देशात निवडणुका ह्या वेगवेगळ्या वेळेत पार पडत गेल्या. भारताने स्वीकारलेल्या लोकशाही प्रणालीमुळे देशातील विविध प्रातिनिधिक संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगावर आहे. त्यामुळे देशातील कोणत्याना कोणत्या भागात वर्षभर निवडणुका पार पडताना दिसतात. अर्थात या सततच्या निवडणूकामुळे प्रशासनावरील ताण, शासनाच्या तिजोरीवर भार, आचारसंहितेमुळे विकासकामांना खिळ, भ्रष्टाचार, काळा पैशाचा निवडणूकीत वापर अशा अनेक बाबींचा प्रादुर्भाव वाढला. या सर्व वाईट प्रथा आणि परंपरा मोडीत काढण्याच्या हेतूने विद्यमान नरेंद्र मोदी सरकारने भारतीय संविधानातील अनेक कलमांत दूरूस्त्यासह एक देश एक निवडणूक कायदा आणलेला आहे. अनेक उदात्त हेतूने हा कायदा आणला असला तरी हेतूबाबत अनेक अंगांनी शंका व्यक्त केली जात आहे. या कायद्याच्या निमित्ताने प्रादेशिक आणि लहान पक्षांना संपुष्टात आणण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे विरोधकांनी टीका केली आहे.

**सूचक शब्द:** लोकशाही, संसदीय शासनप्रणाली, संघराज्य, न्यायिक पूर्नविलोकन, संविधान

**प्रस्तावना:-**

लोकशाहीच्या संवर्धन आणि मजबूतीसाठी पारदर्शक निवडणूका ही पूर्वअट आहे. आधुनिक काळात जगभर ज्या ज्या देशांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला अशा सर्व देशांत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सार्वत्रिक व प्रातिनिधिक निवडणूकीचा मार्ग स्वीकारलेला आहे. शासन पद्धती अध्यक्षीय असो किंवा संसदीय अथवा अनेकात्मक कार्य पालिका असो निवडणूक प्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक व भयमूक्त वातावरणात पार पडणे आवश्यक ठरते. भारत संसदीय शासन पद्धती स्वीकारलेला जगातील सर्वात मोठा देश असून ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत व विविध सोसायटीपासून पतसंस्था पर्यंत अनेक प्रातिनिधिक संस्थांच्या निवडणुका या चालत असतात. भारतात निवडणूका म्हणजे एक प्रकारचे राष्ट्रीय पर्व असल्यासारखे वाटते. वर्षभर देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागात या निवडणुका चालत असतात अशा स्थितीत सततच्या निवडणूका म्हणजे प्रशासनापुढील एक प्रकारचे आव्हान ठरताना दिसते. लागोपाठ येणाऱ्या निवडणूका मुळे प्रशासनावर अतिरिक्त ताण येऊन विकास कामांना खिळ बसतो शिवाय वेळ, पैसा श्रम यांचा अपव्यय होतो अशा प्रकारचा एक विचार पुढे आला यातूनच अनेक पक्षांनी या सर्व निवडणुका या एकाच वेळी घेऊन एक देश एक निवडणूक संकल्पना राबविण्यात यावी असा आग्रह धरलेला आहे. राजकीय पक्षांमध्ये एनडीएतील घटक पक्षांनी एकमत दर्शविले

International Journal of Engineering, Management and Humanities (IJEMH)
Volume 6, Issue 1, Jan.-Feb, 2025 pp: 198-204 ISSN: 2584-2145 www.ijemh.com

असून सत्ताधारी भारतीय जनता पार्टी यासाठी आघाडीवर आहे शिवाय भारतीय जनता पार्टीने 2019 च्या जाहीरनाम्यात एक देश एक निवडणूक संकल्पनेला समाविष्ट केले होते. आज मितीस एक देश एक निवडणूक संकल्पना विधेयकातून कायद्यात रुपांतरीत झाली असून सध्या हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे सादर करण्यात आले आहे.

एक देश एक निवडणूक ही संकल्पना तशी सर्व साधारण वाटते तथापि हीला पूर्णांशाने अंमलबजावणीत आणण्यासाठी अनेक दिव्य पार करावी लागणार आहेत. या निमित्ताने भारतीय संविधानातील अनेक कलमांत घटनादूरूस्तीने बदल करावे लागणार आहेत. घटना तज्ज्ञांच्या मते, भारतीय संविधानातील मुलभूत ढाचा, संघराज्य व्यवस्था, लोकप्रतिनिधित्वासंबंधी कलमे यास ही संकल्पना बाधा आणणार असल्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाची मान्यता, अर्ध्या घटक राज्यांची संमती या शिवाय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायीक पूर्नर्विलोकन या दिव्यातून या विधेयकाला जावे लागणार आहे. या संकल्पनेच्या निमित्ताने देशातील विविध राजकीय पक्ष, विचारवंत, कायदा व घटना तज्ज्ञ अशा अनेकांनी या संकल्पनेच्या समर्थनार्थ आणि विरोधात टीकाटिप्पणी करत असून याबाबत देशात एकप्रकारे संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे. तथापि सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने या विधेयकाच्या बाजूने व्यापक जनमत तयार करण्यासाठी प्रयत्नशील असून त्यासाठी येणारे अडथळे कायदेशीर मार्गाने कसे दूर करता येतील यासाठी प्रयत्नशील आहे. प्रस्तुत लेखात या संकल्पनेच्या अनुषंगाने चर्चिले जाणारे अनेक मुद्दे, घटनात्मक आणि कायदेशीर बाबी तथा या कायद्याच्या निमित्ताने एकंदरीत पडणारा परिणाम या बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्देश:-**

1. भारतातील सार्वत्रिक निवडणूक विषयक प्रक्रिया, कायदे आणि घटनात्मक तरतुदी यांचा अभ्यास करणे.
2. एक देश एक निवडणूक संकल्पनेची सैद्धांतिक व व्यावहारिक बाजू तपासणे.
3. एक देश एक निवडणूक या संकल्पनेच्या अंमलबजावणीतील घटनात्मक आणि कायदेशीर अडथळ्यांचा अभ्यास करणे.
4. एक देश एक निवडणूक प्रस्तावित कायद्याची फायदे आणि तोटे तपासणे.

**गृहितके:-**

1. एक देश एक निवडणूक संकल्पनेची प्रेरणा राजकीय आहे.
2. एक देश एक निवडणूक संकल्पना राष्ट्रीय पक्षांसाठी फायदेशीर ठरते.
3. एक देश एक निवडणूकीमुळे जनमताचा दबाव राहत नाही.
4. एक देश एक निवडणूकीमुळे प्रशासन व विकास कार्यक्रमात निरंतरता राहील.

**संशोधन पद्धती:-**

सदरील शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून आशय विश्लेषणासाठी अणवेषणात्मक तंत्राचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत लेखासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, संशोधनपर लेख, वर्तमान पत्रातील संपादकीय लेख, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांतील प्रसारित बातम्या व माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

निवडणूका या लोकशाहीच्या आधारशिला असून त्या पारदर्शक, भयमूक्त वातावरणात पार पडणे हे लोकशाहीच्या यशस्वितेचे गमक आहे. निवडणूकांच्या माध्यमातून जनमत, जनतेच्या इच्छा आकांक्षा, नाराजी समजत असते. दर पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणूका या जनतेला अभिव्यक्त होण्याचे माध्यम असून या निवडणुका मुळेच सामान्य जनता ही लोकशाहीत मतदार राजा असते. लोकशाहीत निवडणूका याच केवळ जनतेला मालक करु शकतात.

**एक देश एक निवडणूक संकल्पना:-**

एक देश एक निवडणूक ही संकल्पना अभ्यासकांसाठी नवीन नाही. जगभरातील अनेक देशांमध्ये या संकल्पनेचा अवलंब करताना दिसतात. जर्मनी, हंगेरी, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, स्पेन, स्लोव्हाकीया, अल्बेनिया, पोलंड, बेल्जियम आणि स्वीडन या देशांनी आपल्या देशातील निवडणुका एकत्रितपणे पार पाडतात तथापि लोकसंख्या आणि भूभागाने मोठी असणारी संयुक्त राज्य अमेरिका, कॅनडा, चीन या सारखी राष्ट्रे मात्र एकत्रित निवडणुका घेत नाहीत. वास्तविक अधिक लोकसंख्या व विस्ताराने मोठी असणारी देश मनुष्यबळ, संसाधन आणि दीर्घ काळ चालणारी ही प्रक्रिया यामुळे एकत्रित निवडणुकीचा मार्ग स्वीकारत नाहीत.

शब्दशः एक देश एक निवडणूक म्हणजे सर्व निवडणुका या एकत्रित अर्थात एकाच वेळी घेणे असा होय. भारतात सार्वजनिक क्षेत्रातील जवळपास सर्व संस्थांसाठी लोकशाही स्वीकारल्यामुळे निवडणुक प्रक्रिया ही अपरिहार्यपणे पुढे येते. तथापि वन नेशन वन इलेक्शन या संकल्पनेत लोकसभा, राज्य विधानसभा आणि केंद्र शासित प्रदेशातील विधानसभा यांच्या साठी लागू आहे. या एकत्रित निवडणूक प्रक्रियेत देशातील स्थानिक स्वराज्य संस्था यांचा समावेश होत नाही.

**पार्श्वभूमी**

एक देश एक निवडणूक ही संकल्पना भारतासाठी नवीन नाही. स्वातंत्र्यानंतर 1951-52 साली देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक पार पडली. या निवडणुका लोकसभेच्या 489 जागांसाठी तर राज्यातील सर्व म्हणजे 24 राज्यातील विधानसभासाठी एकत्रितपणे पार पडली. या निवडणुकीत पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सर्वाधिक 365 जागा जिंकून बहुमताने सत्तेत आली. पुढे 1957, 1962 आणि 1967 च्या निवडणूका सुध्दा लोकसभा आणि विधानसभासाठी एकत्रित झाल्या. अर्थात 1967 ची सार्वत्रिक निवडणूक ही शेवटची निवडणूक होती ज्यात लोकसभा आणि विधानसभासाठी एकत्रित मतदान झाले.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूनंतर देशात विविध राज्यात काँग्रेस कमकुवत होत गेली आणि प्रादेशिक पक्ष बळकट झाली. इंदिरा गांधी यांच्या काळात कॉग्रेसमध्ये फूट पडली त्यामुळे अल्पमतात आलेले सरकार बरखास्त करण्यात येऊन निवडणुका फार पडल्या आणि लोकसभा आणि विधानसभांच्या एकत्रित निवडणुकांचे पर्व संपुष्टात आले. पुढील काळात अनेक राज्यांतील सरकारे अल्पमुदतीत बरखास्त झाल्यामुळे निवडणुका बाबतचे वेळापत्रक बदलत गेले. अनेक राज्यात व केंद्रातही आघाड्यांचे राजकारण सुरू झाले त्यामुळे निवडणुका बाबतचा राज्या-राज्यातील किंबहुना केंद्रातील लोकसभांचा ताळमेळ राहीला नाही.

नव्वदच्या दशकात एकत्रित निवडणुका घेण्याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने सुतोवाच केले परंतु आघाड्यांच्या राजकारणामुळे हा विचार मागे पडला. तथापि 2014 मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेल्या भारतीय जनता पक्षाने एक देश एक निवडणूक संकल्पना पुढे आणली आणि या दृष्टीने विचारमंथन सुरू झाले. भारतीय जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात ही संकल्पना समाविष्ट केल्यामुळे पुढील काळात यास मूर्त रुप येईल याची शक्यता बळावली.

2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा सत्तेत आलेल्या सरकारने एक देश एक निवडणूक विधेयकाला मंजुरी दिली असून या अधिवेशनात यांचे कायद्यात रूपांतर होईल या बाबत शंका नाही तथापि या कायद्यामुळे कराव्या लागणाऱ्या घटना दूरूस्त्या, लोकप्रतिनिधित्व कायद्यातील बदल व मुख्य म्हणजे सर्वोच्च न्यायालयात हा कायदा टिकण्याच्या दृष्टीने कायदा व घटना तज्ज्ञ यांचे मत विचारात घ्यावे लागेल. एकंदरीत या अनुषंगाने होत असलेल्या उलटसूलट चर्चा, कायदा अंमलबजावणी संदर्भाने येणाऱ्या अडचणी, अडथळे तथा याचा एकंदरीत

होऊ शकणारा परीणाम यांचा उहापोह या ठिकाणी करण्यात आला आहे.

**उच्च स्तरीय समिती**

एक देश एक निवडणूकीच्या समग्र अभ्यासासाठी माजी राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यांची समिती नेमण्यात आली. समितीने या बाबत विविध अंगाने 191 दिवस अभ्यास करून आपला अहवाल 2 सप्टेंबर 2024 रोजी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांना सूपूर्द केला आहे. हा अहवाल एकूण 18626 पृष्ठांचा असून विविध संबंधित घटकांचे अभिप्राय, मते व सूचना यांचा आधार घेतला आहे. एकूण 47 राजकीय पक्षांनी आपला अभिप्राय नोंदवला असून त्यापैकी 32 पक्षांनी एकत्रित निवडणुकांना पाठिंबा दिला आहे. अनेक वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांतून या विधेयकाबाबत जनतेमधून अभिप्राय मागविण्यात आले. यापैकी 21558 अभिप्राय समितीने विचारात घेतले आहेत. यातील 80 टक्के लोकांनी एकत्रित निवडणुकांना पाठिंबा दिला आहे. या शिवाय या समितीने या विधेयकाबाबत व्यापक चर्चा व विचारविनिमय घडवून आणण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत बैठका घेतल्या आहेत. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे चार माजी मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालयातील 12 माजी मुख्य न्यायाधीश, चार भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त, 8 माजी राज्य मुख्य निवडणूक आयुक्त आणि भारताचे विधी आयोगाचे अध्यक्ष. या शिवाय पत्रकारिता, समाजसेवा, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांची मतेही विचारात घेण्यात आली आहेत. सर्वकष अभ्यासाअंती समितीने मुख दोन शिफारशी अशा केल्या की, पहिल्या टप्प्यात लोकसभेसोबत राज्य विधानसभा यांच्या निवडणुका एकत्रित घ्याव्यात आणि दुसऱ्या टप्प्यात या निवडणुका नंतर 100 दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घ्याव्यात. या निवडणुकीत एकसमान मतदार यादी तयार करावी व एकच मतदान ओळखपत्र दिले जावे. एक देश एक निवडणूक प्रक्रिया अंमलबजावणीत आणण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करावी व ज्या घटना दूरूस्त्या आवश्यक आहेत त्या केल्या जाव्यात.

या उच्च स्तरीय समितीने दिलेल्या अहवालास केंद्रीय कॅबिनेटने 18 सप्टेंबर 2024 रोजी मान्यता दिली असून 129 वी घटनादुरुस्ती विधेयक 2024 आणि केंद्र शासीत प्रदेश कायदा दुरुस्ती विधेयक 2024 या नांवाने संसदेत विधेयक सादर करण्यात आले आहे. 2029 च्या निवडणुका पासून ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**एक देश एक निवडणूक फायदे**

**आर्थिक भार कमी होईल**

सतत होणाऱ्या निवडणूका मुळे राज्यांच्या तिजोरीवर भार पडताना दिसतो. मनुष्यबळ, साहित्य, सुरक्षा बलाची तैनात यामुळे सरकारच्या उत्पन्नाचा मोठा भाग निवडणुकांवर खर्च होत आहे. एकत्रित निवडणुका झाल्या तर हा खर्च कमी करता येईल.

**उद्योग व वित्तीय क्षेत्रावर परिणाम**

निवडणूका मुळे उद्योग आणि वित्तीय क्षेत्रावर विपरीत परिणाम पडताना दिसतो. निवडणूका मुळे बाजार प्रभावित होऊन अर्थव्यवस्थेत अस्थिरता आणि असुरक्षितता निर्माण होत आहे. शिवाय देशांतर्गत व परकीय गुंतवणूक प्रभावित होत आहे.

**सार्वजनिक धोरण आणि प्रशासनावरील प्रभाव**

सततच्या निवडणूका मुळे शासन व प्रशासनातील गतिशीलता प्रभावित होत आहे. निवडणूकांच्या निमित्ताने येणाऱ्या आचारसंहितेमुळे विकास कामे व विविध प्रकल्प रखडताना दिसत आहेत.

**शासनाच्या धोरण आणि कार्यक्रमांवर प्रभाव**

निवडणूका मुळे सत्तेत असलेल्या सरकारला अथवा विरोधकांना अव्यवहार्य व लांगूलचालन करणाऱ्या घोषणा व आश्वासन द्यावी लागत आहेत. किंबहुना अशा प्रकारच्या अश्वासनाच्या पूर्ततेसाठी

सरकारच्या तिजोरीवर भार पडून विकास कामांना खिळ बसत आहे.

**राजकीय स्थिरता**

एक देश एक निवडणूक मुळे मध्यावधी निवडणूकांची शक्यता कमी होऊ शकते.

**प्रशासकीय गतिमानता आणण्यासाठी**

लागोपाठ येणाऱ्या निवडणूका मुळे संपूर्ण प्रशासकीय व्यवस्था महिनोन्महिने व्यस्त होताना दिसते. अधिसूचनेपासून निकालापर्यंत संपूर्ण प्रशासकीय व्यवस्था निवडणूक प्रक्रियेत व्यस्त झाल्यामुळे जनतेची कामे आणि प्रशासकीय स्तरावरील विविध विकासकामे रखडत आहेत. निवडणूकांची संख्या कमी झाली तर प्रशासनावरील ताण कमी होऊन त्यात गतिमानता येईल.

**काळा पैसा व गुन्हेगारीवर नियंत्रण**

निवडणूकीच्या निमित्ताने भारतात अवैध व काळा पैशाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. मतदारांना पैसा वाटून मत विकत घेण्याची प्रकरणं मागील अनेक निवडणूकीत दिसून आली. एकत्रित निवडणुका झाल्या तर अशा प्रकारच्या चुकीच्या बाबींना आळा घालता येऊ शकते. शिवाय निवडणूकीच्या निमित्ताने उद्भवणारे विवाद व गुन्ह्यांचे प्रमाण ही घटू शकेल. निवडणूकी संदर्भाने निर्माण होणारे वाद यामुळे न्यायालयाचा सुध्दा वेळ वाचवू शकतो.

**मतदानाचे प्रमाण वाढेल:-**

पक्ष आणि नेत्यांचे भवितव्य पर्यायाने मतदार स्वतःचे भवितव्य हे निवडणूकीच्या माध्यमातून ठरवित असतो आणि निवडणूकीची यशस्वीता ही मतदारांच्या सहभागावर अवलंबून असते. भारतात निवडणूकीबाबत मतदारांची उदासिनता हे एक आव्हान राहीलेले आहे. देशातील मागील अनेक निवडणूकीत 50 टक्के पेक्षा कमी मतदानातून अनेक सरकारे सत्तेत आली परंतु लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी मतदानाची टक्केवारी वाढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एक देश एक निवडणूक संकल्पनेचे समर्थन करताना अनेकांनी मतदानाची टक्केवारी वाढेल असा दावा केला आहे.

**एक देश एक निवडणूक आव्हाने**

**घटना दूरूस्त्या**

एक देश एक निवडणूक प्रक्रियेतील मुख्य आव्हान हे घटना दूरूस्तीचे आहे. या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारला भारतीय संविधानातील अनेक कलमांत घटना दूरूस्त्या कराव्या लागतील. यातील काही कलमे ही संघराज्य व्यवस्थेशी व घटक राज्यांशी संबंधित असल्यामुळे घटनेच्या कलम 368 नुसार संसदेच्या 2/3 बहुमताची व अर्ध्या पेक्षा अधिक घटक राज्य व केंद्र शासित प्रदेशातील विधानसभांची संमती आवश्यक असणार आहे. सद्यस्थितीत संसदेतील एनडीएचे बहुमत पाहता संसदेच्या दोन्ही सभागृहाची संमती मिळू शकेल परंतु अनेक घटक राज्यांत भाजपविरहित व भाजपविरोधी सरकारे असल्यामुळे घटक राज्यांची संमती मिळणे कठीण दिसते. 129 वी घटनादुरुस्ती विधेयक 2024 आणि केंद्र शासित प्रदेश कायदा दुरुस्ती विधेयक 2024 या नांवाने हे विधेयक केंद्रीय कायदामंत्री राम मेघवाल यांनी संसदेत मांडले आहे. या घटनादुरुस्ती सोबतच राज्य विधीमंडळाच्या कार्यकालासंबंधी दूरुस्ती करणारे कलम 82 (A) हे संविधानात समाविष्ट करावे लागणार आहे. कारण कलम 82 नुसार विधानसभा भंग झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याची तरतूद त्यामध्ये आहे. या विधेयकामुळे भारतीय संविधानातील कलम 83,172 आणि 327 या कामांमध्ये सुध्दा दूरूस्ती करावी लागणार आहे.

**संघराज्य व्यवस्थेला बाधा**

एक देश एक निवडणूक संकल्पनेमुळे भारतीय शासन व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण असलेल्या संघराज्य पद्धतीवर आघात होण्याची शक्यता अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या कायद्यामुळे केंद्र शासनाच्या अधिकाराचा विस्तार होऊन राज्य सरकारचे

अधिकार संकुचित होतील. 2029 नंतर लोकसभेसोबत सत्तेत आलेल्या राज्यातील सरकारे मुदतपूर्व बरखास्त झाली तर सहा महिन्याच्या आंत निवडणुका घ्याव्या लागतील अथवा दीर्घकाळ राष्ट्रपती राजवटीमध्ये राज्यांना दिवस काढावे लागतील किंवा मध्यावधी निवडणूका नंतर सत्तेत आलेल्या राज्य सरकारचा कार्यकाल हा संसदेच्या कार्यकाळापुरताच राहील. एकंदरीत एक देश एक निवडणूकीमुळे राज्यांच्या अधिकारांना कात्री लागून केंद्रीय सत्ता बळकट होईल.

**अनेक राज्यांतील विधानसभांना फटका**

एक देश एक निवडणूकीनुसार संसदेच्या वर्ष 2029 च्या सार्वत्रिक निवडणूकीबरोबर एकत्रित निवडणुका होणार असल्यामुळे निवडणूकी संदर्भाने अनेक राज्यांच्या सरकारांना फटका बसणार आहे. या कायद्यामुळे 2024 मध्ये लोकसभेबरोबर निवडणूका झालेल्या आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओरिसा, सिक्कीम या राज्यांवर याचा काही परिणाम होणार नाही परंतु उत्तर प्रदेश, बिहार, असाम, गुजरात, गोवा हरियाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, मनिपूर, मेघालय, दिल्ली, पॉडेचरी, पंजाब, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तराखंड, जम्मू काश्मीर, पं. बंगाल या 22 राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार. कारण या राज्यातील विधानसभांच्या मुदतपूर्व निवडणुका घ्याव्या लागतील तर छतिसगढ, मिझोराम, मध्यप्रदेश, राजस्थान व तेलंगणा या राज्यातील विधानसभा निवडणुका उशिरा होतील.

**व्यावहारिकदृष्ट्या अयोग्य**

भारतासारख्या खंडप्राय देशात ज्याची लोकसंख्या आणि भूभाग विशाल आहे अशा ठिकाणी एकत्रित निवडणुका घेणे व्यावहारिक आणि तार्किक दृष्ट्या योग्य होणार नाही अशी शंका अनेकांनी व्यक्त केली आहे. वर्ष 2024 मध्ये भारतातील एकूण मतदारांची संख्या ही 96 कोटी होती ज्यासाठी एक लाखापेक्षा अधिक मतदान केंद्राची आवश्यकता आहे. अशा स्थितीत एकत्रित निवडणूकीसाठी प्रत्येक सभागृह व मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांची आवश्यकता विचारात घेतली तर ही प्रक्रिया कठीण वाटत आहे. शिवाय या निमित्ताने सुरक्षा बलाची आवश्यकता, मतदान कर्मचाऱ्यांची संख्या व प्रशासनावर येणारा प्रचंड ताण विचारात घेता ही प्रक्रिया व्यावहारिक वाटत नाही.

**प्रादेशिक पक्षांसाठी मारक तर राष्ट्रीय पक्षांसाठी पुरक**

एकत्रित निवडणुकीमुळे प्रादेशिक आणि स्थानिक मुद्दे दूर्लक्षित होऊन निवडणूकीचा भर हा राष्ट्रीय मुद्यांवर एकवटेल ज्यामुळे एक देश एक निवडणूक संकल्पना ही प्रादेशिक आणि लहान पक्षांसाठी मारक ठरेल. एक देश एक निवडणूकीमुळे प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व संपुष्टात येऊन विशिष्ट गट वा भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जनतेचे हक्क या माध्यमातून नाकारले जातील अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे. राष्ट्रीय पातळीवर सक्रिय असणाऱ्या व मोठ्या पक्षांना या प्रक्रियेचा फायदा होईल त्यामुळे भारतीय जनता पक्ष यासाठी आग्रही असल्याचे विरोधकांनी टीका केली आहे.

**राष्ट्रीय हितापेक्षा पक्षीय हित भावना:-**

एक देश एक निवडणूक या विधेयकाबाबत विविध पक्षांची मते लक्षात घेतल्यास असे लक्षात येते की, अनेक धोरणात्मक व राष्ट्रीय हिताचे निर्णय घेतांना केंद्र सरकारांना वेगवेगळ्या राज्यांतील सरकारे विरोध करताना दिसतात. अनेक संवेदनशील व महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत अनेकदा या विरोधी सरकारांकडून विरोधासाठी विरोध असेही दिसते. शिवाय आघाड्यांच्या राजकारणात सरकारला कठोर निर्णय घेताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे भविष्यात या सर्व निवडणुका एकत्रित झाल्या तर देशभर समान व सारख्या मुद्द्यांवर निवडणुका होऊ शकतील.

एक देश एक निवडणूक प्रणालीसाठी भाजप, जेडीयू, तेलुगु देसम पार्टी (टीडीपी), एलजेपी, आसाम गण परिषद, बहुजन समाज पक्ष (बसपा) आणि शिवसेना (शिंदे) गट यांनी पाठिंबा दिला आहे. तर विरोध करणाऱ्या पक्षांमध्ये काँग्रेस, समाजवादी पार्टी

(एसपी), आम आदमी पार्टी (आप), सीपीएम या सारख्या १५ पक्षांचा समावेश आहेत. तथापि झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम), इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययूएमएल) यांच्यासह 15 पक्षांनी एक देश एक निवडणूकीबाबत अजून कोणतीही भूमिका जाहीर केलेली नाही.

**निष्कर्ष व समारोप:**

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, वर्ष २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तब्बल ६०,००० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. यात पक्षांनी केलेला खर्च आणि निवडणूक आयोगाने निवडणुकांचे नियोजन करण्यासाठी केलेल्या खर्चाचा समावेश आहे. 2024 मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत पक्ष आणि उमेदवाराद्वारे झालेला अघोषित अर्थात बेकायदेशीर खर्चाबाबत अनेक आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी डोळे विस्फारणारे आकडे सांगितले आहेत. शिवाय सतत होणाऱ्या निवडणूकामुळे प्रशासन व्यवस्थेचा वेळ, श्रम आणि पैसा यांचा अपव्यय होतो. प्रशासकीय, शासकीय कर्मचारी आणि सुरक्षा दल यांचा वापर या निवडणूक प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीवेळी सुरक्षा दल, शासकीय कर्मचाऱ्यांना विविध ठिकाणी निवडणुकीच्या कामासाठी लावलं जातं. निवडणुका एकत्र ठेवल्यास कर्मचाऱ्यांचा व्याप कमी होईल आणि ते आपल्या कामावर अधिक लक्ष देऊ शकतील. सत्ताधारी एनडीएतील घटक पक्ष आणि भारतीय जनता पक्षांनी या एक देश एक निवडणूक संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी संविधान, कायदा, न्यायालय आणि जनता या सर्व स्तरावर कायदेशीर तयारी ठेवलेली दिसते त्यामुळे येणाऱ्या वर्ष 2029 च्या सार्वत्रिक निवडणुका ह्या एकत्रित होण्याची खात्रीलायक शक्यता आहे. अर्थात एक देश एक निवडणूक ही संकल्पना भारतीय लोकशाहीसाठी मारक ठरते का तारक ठरते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**संदर्भ**

1. High level committee report on simultaneous election in India 14 March 2024.
2. K. Gireesan, Chinmay Bendre, One Nation One Election and Representatives Democracy, The Hindu, Published Article, December 30, 2024.
3. Singh, Kartikey(2023-09-04) “Explained What is debate around ‘One Nation One Election’? The Hindu. ISSN 0971-751X Retrieved 2024-09-10.
4. A Ministry of Law and Justice, Legislative Department (2 September 2023) Publication of Notification regarding Constitution of High Level Committee to examine the issue of simultaneous elections “
5. दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. 23 जून 2019
6. दै. लोकसत्ता, 25 जानेवारी 2024 पृ.क्र. 8
7. दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. 23 जून 2019.